■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ द्विभाषिक ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३३८ ■ शुक्रवार दि.१२ डिसेंबर २०२५ ■ आरएनआय - एमएएचबीआयएल १०५४८ ■ किंमत २ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ BILINGUAL ■ Year - 02 ■ Issue - 338 ■ Friday Dt. 12 December 2025 ■ TC : MAHBILI 10548 ■ Price - 2 Rupees ■ Pages 4

सायं.दैनिक
# विश्वनायक

Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo.86868 88898




# सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंत्याचा मनमानी कारभार चव्हाट्यावर

## सार्वजनिक बांधकाम विभागात ‘भंगार’ घोटाळ्याची जोरदार चर्चा!

**विश्वनायक न्यूज**

बीडच्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये भंगार विक्रीच्या नावाखाली कोट्यवधींची आर्थिक लूट झाल्याच्या चर्चांनी राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. बांधकाम विभागातील संबंधित इंजिनिअरच्या मनमानी कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, अधिकृत माहिती देण्यास त्यांनी केलेली टाळाटाळ संशय अधिकच गडद करते आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्हा न्यायालयाच्या दोन्ही प्रवेशद्वारांवरील कमानी तसेच जालना रोड, सहयोग नगर येथील दोन शासकीय धान्य गोदामांचे लोखंडी स्ट्रक्चरही सरकारी मालमत्ता पाडून त्याचे भंगार बेकायदेशीररित्या खासगी व्यक्तींना विकण्यात आला, अशी जोरदार चर्चा आहे. या सर्व कारभारात व्यवहार कायदेशीर मार्गाने न झाल्याची शंका अधिकाऱ्यांमध्ये वर्तवली जात आहे. हा बेकायदेशीर कारभार करण्यामध्ये कोण कोण गुंतले आहेत, याची सविस्तर चौकशी होण्याची गरज आहे.




बीड शहरामध्ये विविध शासकीय बांधकामे सातत्याने सुरू असतात. शहरामध्ये ही कामे अजूनही सुरू असून यापूर्वी झालेल्या कामांच्या बाबतीत शंका व्यक्त केली जात आहे. बीडच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित इंजिनियर आणि अधिकाऱ्यांनी संगणमत करून ज्या ठिकाणी काम करण्यात आले त्या जागेच्या अगोदरची मालमत्ता म्हणजे ज्याला भंगार म्हणून संबोधले जाते त्याची परस्पर विल्हेवाट लावली असल्याची चर्चा होत आहे. ही विल्हेवाट लावत असताना लाखो रुपयांचा बेकायदेशीर व्यवहार झाल्याचेही बोलले जात आहे. या प्रकरणातील सर्वात गंभीर आरोप म्हणजे, सार्वजनिक जाहिरात न देता, निविदा प्रक्रिया टाळण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांची योग्य परवानगी न घेता भंगाराची विक्री करण्यात आली. कोणतेही टेंडर न काढता, जवळच्या व्यक्तीला हे भंगार विकण्यात आले आणि त्यातून लाखो रुपयांचा व्यवहार केला असल्याचे बोलले जात आहे. ज्यामुळे सरकारी मालमत्तेचे प्रचंड आर्थिक नुकसान झाल्याचा संशय वाढला आहे. पीडब्ल्यूडी विभागात हा प्रकार ‘भंगाराच्या नावाखाली मोठा घोटाळा’ असल्याचा कयास अनेकांकडून वर्तवला जात आहे.यामध्ये कोण कोण सहभागी आहेत याची चौकशी होण्याची गरज आहे.

केवळ एवढेच काम नाही तर यापूर्वीही संबंधित अभियंता आणि काही अधिकार्यांनी एकत्रितपणे अशा बेकायदेशीर सामान विकण्याच्या प्रकारामध्ये मोठ्या प्रमाणात घोळ घालीत लाखोंचा भ्रष्टाचार केल्याची चर्चा होत आहे.




### वरिष्ठ स्तरावरील चौकशीची मागणी...

जिल्हा न्यायालय आणि शासकीय गोदामांची मालमत्ता पाडून विकणे हा हलकासा विषय नाही. या प्रकरणाची महसूल, भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग, किंवा विभागीय आयुक्त पातळीवर सखोल चौकशी झाल्यास अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे हा व्यवहार चिरीमिरीचा वाटत असला तरी यातून लाखो रुपयांचा व्यवहार झाल्याचे बोलले जात आहे म्हणूनच याची सखोल चौकशी होण्याची गरज आहे.

### निविदा प्रक्रियेचा फज्जा? ‘टेंडर’ न घेता थेट सौदा?

या प्रकरणातील सर्वात गंभीर आरोप म्हणजे सार्वजनिक जाहिरात न देता निविदा प्रक्रिया टाळण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांची योग्य परवानगी न घेता भंगाराची विक्री करण्यात आली. टेंडर न करता जवळच्या/ओळखीच्या व्यक्तींना कमी किमतीत भंगार देण्यात आले. टेंडर काढण्यासाठी विशिष्ट रक्कम लागते हे मान्य आहे मात्र मात्र भंगार विकण्यासाठी शासकीय परवानगी लागते ती घेतली की नाही हा खरा प्रश्न आहे. याबाबत अधिकारी काहीच बोलायला तयार नाहीत. ज्यामुळे सरकारी मालमत्तेचे प्रचंड आर्थिक नुकसान झाल्याचा संशय वाढला आहे. पीडब्ल्यूडी विभागात हा प्रकार ‘भंगाराच्या नावाखाली मोठा घोटाळा’ असल्याचा कयास अनेकांकडून वर्तवला जात आहे.

### माहिती देण्यास संबंधित बोलघेवड्या अभियंत्याची टाळाटाळ

सरकारी सामानाची म्हणजे भंगाराची परस्पर विल्हेवाट लावणाऱ्या संबंधित अभियंता आणि अधिकाऱ्याला अधिकृत माहिती मागितली, पण या प्रकरणाबाबत माहिती देण्यास त्यांनी टाळाटाळ केली. फोन न उचलणे, भेट टाळणे आणि कागदपत्रे न दाखवणे, असा संशयास्पद पवित्रा त्यांनी घेतला आहे. जिल्हा न्यायालयासारख्या अतिसंवेदनशील शासकीय जागेचा भंगार विल्हेवाटीबाबत एखादा अधिकारी माहिती द्यायला तयार नसणे हे स्वतःच मोठे प्रश्न निर्माण करणारे आहे.

## दोघांना मारहाण; सरपंचासह सहा जणांवर गुन्हा

**केज । प्रतिनिधी**


ग्रामपंचायतीने केलेल्या कामात भ्रष्टाचार झाल्याच्या अनुषंगाने पंचनामा करण्यास आलेल्या पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांसमोर सरपंच व त्याच्या इतर पाच साथीदारांनी दोघांना काठीने व लाथाबुक्याने बेदम मारहाण करीत एकाचा हात फॅक्चर केल्याची घटना सुकळी (ता. केज) येथे घडली. याप्रकरणी सरपंच व इतर पाच जणांविरुद्ध युसुफवडगाव पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

सुकळी (ता. केज) येथे ग्रामपंचायती अंतर्गत झालेल्या कामामध्ये भ्रष्टाचार झाल्याच्या अनुषंगाने पंचनामा करण्यासाठी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी अनिल चौरे, जि. प. बांधकाम उपविभागचे शाखा अभियंता संघरक्षित हातागळे यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी हे ८ डिसेंबर रोजी दुपारी २.३० वाजता गावात आले होते. हे अधिकारी गावातील भास्कर महादु जावळे यांचे घराचे जवळील नाली बांधकामाची पाहणी करीत असताना त्याठिकाणी अमर मोहनराव गायकवाड, विनोद विलास काटकर, शाहु रघुनाथ गायकवाड, अमोल विनायक गायकवाड हे गेले. तर त्या ठिकाणी सरपंच नितीन साहेबराव गायकवाड, रविराज उत्तम खाडे, अक्षय बालासाहेब गायकवाड, प्रविण बळीराम भिशे, अनिकेत जिवनराव गायकवाड, प्रदिप बळीराम भिशे, ज्ञानेश्वर विक्रम गव्हाणे आले. त्यांच्यामध्ये कचरा कुंडीबाबत बोलणे चालू असताना सरपंच नितीन गायकवाड याने अमोल गायकवाड यास तुझा काय संबंध नाही असे म्हणत अंगावर धावून मारहाण करू लागले. तेवढ्यात अमर गायकवाड हे त्यास मारू नको म्हणत सोडवण्यास गेले सरपंच नितीन गायकवाड, अक्षय गायकवाड, प्रदीप भिशे या तिघांनी काठीने अमर गायकवाड याच्या हातावर, डोळ्याजवळ, पाठीत, खांद्यावर, पायाच्या पोटरीवर मारहाण करीत गंभीर जखमी केले. यापुढे गावातील भ्रष्टाचार संबंधाने पुन्हा कोठे आवाज काढला, वरच्या ऑफिसला तक्रारी केल्या तर तुम्हाला जिवे मारून टाकू धमक्या दिल्या. अमर गायकवाड याच्यावर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू असून त्याने पोलिसांना दिलेल्या जबाबावरून सरपंच नितीन गायकवाड, अक्षय गायकवाड, प्रदीप भिशे, रविराज खाडे, अनिकेत गायकवाड, ज्ञानेश्वर गव्हाणे या सहा जणांविरुद्ध युसुफवडगाव पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तपास फौजदार भारत बर्डे हे करीत आहेत.

## बस-दुचाकीची समोरासमोर धडक; शेतकऱ्याचा मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर रस्त्यावर काल (१० डिसेंबर) रात्री झालेल्या बस दुचाकी भीषण अपघातात काकडहिरा येथील शेतकरी विश्वास बागलाने वय ४१ वर्ष यां शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. पुण्याहून बीडकडे येणाऱ्या बसने मोटारसायकलला समोरून जोरदार धडक दिली. ही घटना रात्री सुमारास १० वाजता काकडहिरा परिसरात घडली. धडकेनंतर काही काळ वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. गंभीर जखमी अवस्थेत विश्वास बागलाने यांना तात्काळ बीड येथील रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.



विश्वास बागलाने हे मोटारसायकलवरून गावाकडे जात असताना बस (क्रमांक एम.एच.१४.०१९७) ने त्यांच्या मोटारसायकलला जोराची धडक दिली. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. संबंधित बस पोलिस मुख्यालयात जमा करण्यात आली असून पुढील तपास ग्रामीण पोलीस करत आहेत. या दुर्घटनेमुळे काकडहिरा परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## बार्शी नाका चौकात गुत्तेदाराचा मनमानी कारभार?

### चुकीच्या ठिकाणी बसवले विद्युत पोल; नागरिकांत नाराजीचा सूर

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील रस्त्यांच्या कामात गुत्तेदाराकडून मनमानी व गलथान कारभार सुरू असल्याचे पुन्हा एकदा समोर आला आहे. बार्शी नाका मुख्य चौकात विद्युत पोल अत्यंत चुकीच्या ठिकाणी बसवल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

बीड शहरातील रस्ते काम सुरू असून रस्त्याच्या मध्यभागापासून (सेंटर पासून) १४ मीटर रुंदीच्या रस्त्याचे काम सुरू असून दोन्ही बाजूंना विद्युत पोल आणि पाण्याच्या पाईपलाईनसाठी एक मीटर जागा राखीव ठेवण्यात आली आहे. मात्र याच नियमाकडे दुर्लक्ष करून संबंधित गुत्तेदाराने नालीच्या अगदी कडेवर नालीच्या अलीकडेपोल बसवल्याचे स्पष्ट दिसत आहे. नियमानुसार नाल्यापासून किमान एक मीटर अंतर हे विद्युत पूर्व पाण्याच्या पाईपलाईन साठी राखीव ठेवण्यात आले आहे. परंतु हे बंधनकारक असतानाही कोणत्याही परवानगी शिवाय हे मनमानी पद्धतीने रस्त्याच्या बाजूस खांब बसवण्यात आला आहे करण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे की, पुरेशी जागा उपलब्ध असतानाही गुत्तेदाराने बेपर्वाईने खांब उभारल्याने वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका आणि पाणीवाहिनीचे नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे. विद्युत पूलच्या खालीच पाईपलाईन असल्याने भविष्यात जर पाईपलाईन मध्ये काही बिघाड झाला तर दुरुस्त करणे हे शक्य होणार नाही, त्यामुळे तो खांब काढून नारीच्या बाजूस बसवावा अशी मागणी होत आहे. चौकातील रस्ता आधीच अरुंद असून चुकीच्या ठिकाणी उभा केलेला पोल वाहतुकीस गंभीर अडथळा बनला आहे.



केवळ बार्शी नाका चौकतच नव्हे तर नगर रोडसह शहरातील इतर भागातही याच गुत्तेदाराकडून चुकीच्या जागी पोल बसवल्याच्या तक्रारी पूर्वीपासून येत असल्याचा नागरिकांचा दावा आहे. वारंवार तक्रारी होऊनही सुधारणा न झाल्याने संताप वाढत आहे. दरम्यान, बांधकाम विभागाने सदर चुकीच्या ठिकाणी उभारलेले पोल तात्काळ हटवण्याचे औपचारिक पत्र जारी केले आहे. तसेच या मनमानी कारभाराबाबत संबंधित गुत्तेदारावर कडक कारवाई करून कंपनीला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी स्थानिक पातळीवर जोर धरत आहे. नियमांचे उल्लंघन,अपुरे पर्यवेक्षण आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अशा घटना वारंवार घडत असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे. पुढील काळात अशा त्रुटी टाळण्यासाठी कठोर देखरेख, स्थलपरीक्षण आणि जबाबदारी निश्चित करण्याची गरज असल्याचेही सांगितले जात आहे.

## महावितरणच्या उपभियंत्यांच्या आश्वासनानंतर क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे आंदोलन स्थगित

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील लाडेगाव, दीपेवडगाव, लाडेवडगाव, मुलेगाव येथील शेतकऱ्यांना उच्च दाबाने दररोज आठ तास वीज पुरवठा करण्यात यावा, या मागणीसाठी क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांच्या नेतृत्वाखाली होळ येथील ३३ केव्ही विद्युत उपकेंद्रासमोर गुरुवारी धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी धारूरचे उपकार्यकारी अभियंता गोकुळ मोरे, कनिष्ठ अभियंता अभिजित पाटिल यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.



केज तालुक्यातील लाडेगाव, दीपेवडगाव, लाडेवडगाव, मुलेगाव येथील शेतकऱ्यांना कृषि पंपासाठी तब्बल ३० व काही ठिकाणी ३६ तासानंतर कमी दाबाने विद्युत पुरवठा होत असल्याने विजेअभावी रब्बी हंगामातील पिकांना पाणी मिळत नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊ लागल्याने शेतकरी हैराण झाले होते. त्यामुळे दररोज उच्च दाबाने ८ तास वीज पुरवठा करावा, होळ ३३/११ के.व्ही. विद्युत उपकेंद्रांतर्गत लाडेगाव, दिपेवडगाव, लाडेवडगाव, मुलेगाव येथील गावठाण व कृषी फीडर स्वतंत्र करून वीज पुरवठा करण्यात यावा, होळ उपकेंद्रास ५ एमव्हिए + १० एमव्हिए क्षमतेचे रोहित्र तात्काळ बसविण्यात यावे या मागण्यांसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांच्या नेतृत्वाखाली होळ येथील विद्युत उपकेंद्रासमोर गुरुवारी सकाळी ११ वाजेपासून दुपारी २ वाजेपर्यंत धरणे आंदोलन करण्यात आले. तर भाजपाचे नेताजी शिंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ( शरद पवार गट) संभाजी लोमटे यांनी आंदोलनात सहभागी होऊन पाठिंबा दिला. यावेळी धारूरचे उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता गोकुळ मोरे, कनिष्ठ अभियंता अभिजित पाटील यांनी आंदोलकांच्या मागण्या मान्य करून पुढील तीन दिवसात वीज पुरवठा पूर्ण क्षमतेने देण्याचे लेखी आश्वासन दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले.

आंदोलनात बालाजी गुळभीले, ॲड. राजेश शिंदे, योगेश्वर अंबाड, दीपक अंबाड, हरिभाऊ आघाव, प्रमोद पांचाळ, राजाभाऊ सोमवंशी, संतोष शिंदे, सुशांत अंबाड, अंगद अंबाड यांच्यासह लाडेगाव, दिपेवडगाव, लाडेवडगाव, मुलेगाव, होळ येथील शेतकरी सहभागी झाले होते. युसूफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

सायं. दैनिक
विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख • Mo.86868 88898



# आ. संदीप क्षीरसागरांनी कब्रस्तानची भिंत बांधून दिलीच नाही

## ■ अखेर महेदवीया समाजाने कब्रस्तानसाठी बांधले पत्र्याचे पार्टिशन ■

## सामाजिक कामात शासन-प्रशासन, लोकप्रतिनिधी कामी येत नसतील तर त्यांचा उपयोग काय?

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील ऐतिहासिक महेदवीया दायरा कब्रस्तानच्या पाहणीनंतर तीन वर्ष उलटूनही आमदार संदीप क्षीरसागर यांनी कब्रस्तानच्या संरक्षक भिंती काही बांधून दिल्या नाहीच. यामुळे महेदवीया समाजाने जवळ असलेल्या निधीत ऐपतीप्रमाणे पत्र्याचे पार्टिशन बांधून घेतले. यामुळे बहुधा हे फक्त बीड शहर किंवा जिल्ह्यातच नाही तर संपूर्ण भारत देशात एकमेव कब्रस्तान असेल ज्याची संरक्षक भिंत म्हणून पत्र्याचे पार्टिशन बांधण्यात आले. असे उद्विग्न मत महेदवीया समाजाचे विश्वस्त तथा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी व्यक्त केले असून सामाजिक कामात जर शासन-प्रशासन व लोकप्रतिनिधी कामी येत नसतील तर त्यांचा उपयोग काय? असा प्रश्नही उपस्थित केला आहे.**

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहरातील मोमीनपुरा भागात साडेतीनशे वर्षांपूर्वीपासून महेदवीया दायरा कब्रस्तान स्थित आहे. या कब्रस्तानात हज़रत बंदगी मियाँ सय्यद शाह आलम (रहमतुल्ला अलैह) यांची दरगाह ही आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून या कब्रस्तानच्या दोन्ही रस्त्यालगत असलेल्या ऐतिहासिक चिरेबंदी भिंती जवळपास नेस्तनाबूत झाल्या आहेत. त्या बांधण्याकरिता सन २०१४ सालापासून खासदार, आमदार, जिल्हा प्रशासन आणि बीड नगर परिषदेकडे सातत्याने मागणी करण्यात येत आहे. परंतु शासन-प्रशासन दरबारी अजूनही याची दखल घेतली गेलेली नाहीये. ना शासन धावून आले आहे. नाही म्हणायला विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांनी २३ जानेवारी २०२३ साली महेदवीया दायरा कब्रस्तान ची पाहणी केली होती. त्यावेळी त्यांनी आश्वासन दिले होते की, लवकरच कब्रस्तानच्या संरक्षक भिंतींचे बांधकाम करून देण्यात येईल. याला आता जवळपास तीन वर्ष होत आले आहेत. तरीही कब्रस्तानच्या संरक्षक भिंती काही बांधून देण्यात आल्या नाहीत.

भिंती जमीन दोस्त झाल्याने कब्रस्तानात बेवारस कुत्र्यांचा सुळसुळाट झाला. त्यांनी कब्रस्तानातील कबरींची मोठ्या प्रमाणात नासधूस करून टाकली आहे. यामुळे महेदवीया समाजाकडे जमा असलेल्या निधीतून भिंतींच्या जागेवर पत्र्याचे पार्टिशन बांधून घेण्यात आले आहे. पत्र्याचे पार्टिशन कब्रस्तानच्या संरक्षक भिंत म्हणून बांधण्यात आलेले हे कब्रस्तान बीड शहर व जिल्हाच नाही तर बहुदा संपूर्ण भारतात एकमेव कब्रस्तान असेल असे उद्विग्न मत या अनुषंगाने महेदवीया समाजाचे विश्वस्त तथा मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ यांनी मांडले असून जर सामाजिक कामात शासन-प्रशासन व लोकप्रतिनिधी कामी येत नसतील तर त्यांचा उपयोग काय? असा प्रश्नही उपस्थित केला आहे.







# कड्याच्या बंधाऱ्याकडे कोणी लक्ष देणार का?

## तीन महिन्यांपासून बंधाऱ्यावरची वाट चालू केली नाही

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कडा येथील कोल्हापूरी बंधाऱ्याच्या दुरूस्तीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. कारण कडि नदीला १५ सप्टेंबर रोजी महापूर आला होता आणि या बंधाऱ्याचे दरवाजे जास्त प्रमाणात बंद ठेवल्याने या बंधाऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या बंधाऱ्यांकडे कायमच संबंधित कार्यालय, अधिकारी यांचे दुर्लक्ष राहीले आहे. याआधी हि मोठ्या प्रमाणात दरवाज्यातून पाणी गळती होत होती. संबंधितांना लेखी तक्रार केली होती तसेच वारंवार विनंती केली परंतु आजपर्यंत कायमस्वरूपी उपाययोजना केल्या नाहीत. फक्त एकवेळ तात्पुरते पाणी गळती थांबविण्यासाठी थातुरमातुर काम संबंधित अधिकाऱ्यांनी करून दिले होते. त्यानंतर आजपर्यंत कसलीच कामे किंवा कायमस्वरूपी उपाययोजना केल्या नाहीत.



नदिला महापूर येऊन बंधाऱ्याची तुटफुट होऊन तीन महिने होत आलेत तरीही आजपर्यंत बंधाऱ्यावरील वाट सुध्दा चालू केली नाही. तर दुरूस्तीचे काम कधी करतील? हि वाट बंद असल्याने शेतकऱ्या सह नागरीकांचे हाल होत आहेत. शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी व सुंदरनगर (झोपडपट्टी) कडील नागरीकांना ये-जा करण्यासाठी मोठा वळसा घ्यावा लागत आहे. तीन महिने झाले वाट बंद असून अधिकारी पाहणीसुध्दा करत नाहीत अशी प्रतिक्रिया एका शेतकऱ्याने दिली. हा बंधारा खराब अवस्थेत असल्याने प्रत्येक दरवाज्यातून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होते त्यामुळे पाणी साठून राहत नाही. आणि वाट हि बंद असल्याने या बंधाऱ्यांची तातडीने दुरुस्ती करून वाट सुरू करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. संबंधितांकडून आजपर्यंत कसलीच दखल घेतली नसल्याने नागरिकांनी हा बंधारा लवकरात लवकर दुरूस्तीचे काम सुरू करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.


# बीड शहरातील जम जम कॉलनीमध्ये मोकाट कुत्र्यांचा वाढता त्रास

## नागरिकांत भीतीचे वातावरण; न.प.कडून तातडीने बंदोबस्ताची मागणी - इनामदार

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील जम जम कॉलनीसह विविध भागांत मोकाट कुत्र्यांचा उच्छाद मोठ्या प्रमाणात वाढला असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा गंभीर बनला आहे. शाळेत जाणारी लहान मुले, सकाळी व्यायामासाठी जाणारे नागरिक, महिलावर्ग तसेच रात्री प्रवास करणाऱ्या नागरिकांना कुत्र्यांच्या टोळक्यांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेकांनी भीतीमुळे रात्री बाहेर पडणेही टाळल्याचे सांगितले.

शहरातील अनेक भागांत-मुख्य बाजारपेठ, वसाहती, शाळांच्या परिसरात-कुत्र्यांचे टोळके मुक्तपणे फिरत असल्यामुळे नागरिकांच्या मनात दहशत पसरली आहे. विशेष म्हणजे काही ठिकाणी मुलांवर आणि ज्येष्ठ नागरिकांवर हल्ल्याच्या घटना घडल्याची माहिती समोर आली असून त्यामुळे नागरिकांत चिंतेचे वातावरण अधिकच गडद झाले आहे. या पार्श्वभूमीवर जम जम कॉलनीतील स्थानिक नागरिक सोमेश कदम यांनी नगरपरिषदेचे लक्ष वेधण्यासाठी लेखी निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



कदम यांनी सांगितले की, शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात वाढला असला तरी नागरी मूलभूत सुविधांकडे आणि सुरक्षिततेकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. जम जम कॉलनीसह संपूर्ण शहरात मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे अत्यावश्यक झाले आहे. नागरिकांकडूनही नगरपरिषदेकडे सतत तक्रारी होत असून प्रशासकीय पातळीवर तत्काळ पावले उचलण्याची प्रतीक्षा सुरू आहे. अनेक रहिवाशांनी मोकाट कुत्र्यांमुळे रात्री उशिरा घरी परतणाऱ्या युवकांनाही त्रास होत असल्याचे सांगितले. शाळकरी मुलांचे पालकही वाढत्या धोक्यामुळे चिंतित आहेत.

# शिराढोणच्या किरण (दादा) पाटील यांची राज्यस्तरीय समितीवर निवड

**शिराढोण । प्रतिनिधी**



भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतारदिन महाराष्ट्र शासकीय समितीवर शिराढोण गावचे भूमिपुत्र किरण (दादा) पाटील यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे शिराढोण गावासह संपूर्ण परिसरात आनंद व्यक्त केला जात आहे. किरण पाटील यांच्या नावाची राज्यस्तरावर नोंद घेत समितीमध्ये त्यांची निवड झाल्याने धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील शिराढोण गावाचे प्रतिनिधित्व अधिक मजबूत होईल, असे ग्रामस्थांचे मत आहे.

गावकऱ्यांनी सांगितले की, किरण पाटील यांची निवड ही गावासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या माध्यमातून समितीच्या कामात स्थानिक पातळीवरील विषयांना योग्य प्रतिनिधित्व मिळेल. गावातील नागरिक, विविध सामाजिक संघटना आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बीड जिल्ह्यातील १८ वर्षांवरील विधवा, घटस्फोटीत, अविवाहित महिलांसाठी शासकीय योजनांची माहिती भरण्याचे आवाहन - अशफाक इनामदार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील १८ वर्षांवरील विधवा, घटस्फोटीत (तलाकशुदा) आणि अविवाहित (बिन लग्नाच्या) महिलांनी शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आपल्या नजीकच्या अंगणवाडी केंद्रात माहिती भरून द्यावी, असे आवाहन माजी सभापती अशफाक इनामदार यांनी केले आहे. या माहिती संकलनामुळे कोणतीही पात्र महिला शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. माजी सभापती अशफाक इनामदार यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले की, अनेक पात्र महिलांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची



माहिती मिळत नाही किंवा अर्ज कसा करायचा हे माहीत नसते. ही बाब लक्षात घेऊन, १८ वर्षांवरील सर्व विधवा, घटस्फोटीत आणि अविवाहित महिलांची संपूर्ण माहिती एका विशिष्ट फॉरमॅटमध्ये अंगणवाडी केंद्रांमार्फत गोळा केली जाणार आहे.

**अंगणवाडी केंद्रात माहिती भरण्याचे आवाहन**

योजनेसाठी पात्र असलेल्या महिलांनी लवकरात लवकर त्यांच्या परिसरातील अंगणवाडी केंद्रात जाऊन विहित नमुन्यातील (वरील फॉरमॅटमधील) माहिती भरावी आणि ती अंगणवाडी सेविकांकडे जमा करावी. या माहिती संकलनाचा मुख्य उद्देश हा आहे की, गरजू आणि पात्र महिलांना त्यांच्या हक्काच्या शासकीय योजनांचा लाभ थेट आणि वेळेवर मिळावा.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

या संदर्भात कोणतीही अडचण किंवा अधिक माहिती हवी असल्यास, महिलांनी माजी सभापती अशफाक इनामदार यांच्याशी +९१ ९८२२३ ६०२०६ या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र महिलांनी या आवाहनाची नोंद घेऊन त्वरित अंगणवाडी केंद्रांशी संपर्क साधावा.

# वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

कर्तव्यदक्ष आणि मनमिळाऊ अधिकारी म्हणून ओळखले जाणारे बीड जिल्हा वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांचा वाढदिवस आज मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. दिवसभर जिल्ह्यातील सर्व स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा अक्षरशः वर्षाव होत राहिला. प्रत्यक्ष भेटी, दूरध्वनी, सोशल मीडिया अशा सर्व माध्यमांतून नागरिक, अधिकारी व कर्मचारी यांनी राजेश खटावकर त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. वाढदिवसाला सणासुदीचे स्वरूप आले होते.

अतिशय शांत, संयमी, सदैव हसमुख आणि सोज्वळ स्वभावामुळे खटावकर यांची जिल्ह्यातील शासकीय कर्मचारी वर्गात



विशेष ओळख आहे. कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या समजून घेऊन त्यांचे मार्गी लागणारे समाधानकारक निवारण करण्याची त्यांची कार्यशैली आदर्श मानली जाते. त्यामुळेच लोकप्रिय, समंजस आणि तत्पर अधिकारी म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व जिल्हा प्रशासनात आदराने पाहिले जाते. विनाअनुदानित शाळा कृती समिती, बीड जिल्हा मुख्याध्यापक संघ, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी महासंघ, विविध शैक्षणिक संघटना, संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षणप्रेमी नागरिक यांच्यासह अनेकांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांना येणाऱ्या कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# केज बायपास व बसडेपो साठी केज विकास संघर्ष समितीचे पुन्हा आंदोलन

**केज । प्रतिनिधी**

येथे रिंगरोड बायपास किंवा उड्डाणपूल आणि केज येथे बसडेपो तात्काळ मंजूर करा या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीने पुन्हा एकदा आंदोलनाचा पवित्रा घेतला असून नवीन वर्षात यामागणीसाठी आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा समितीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी दिला आहे.

समितीच्या वतीने केज विधानसभेच्या आमदार श्रीमती नमिताताई मुंदडा व केज तहसीलदार यांना निवेदनाच्या प्रती देऊन वरील दोन्ही प्रश्नावर शासन दरबारी कार्यवाही करण्यासाठी प्रयत्न करण्याची विनंती केली आहे. सध्या नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरु असून आमदार नमिताताईंनी केजवासियांचे हे महत्वाचे दोन प्रश्न अधिवेशनात मांडण्याचीही विनंती केली आहे. केज शहर सध्या खामगाव- पंढरपूर व अहमदपूर-अहमदनगर या महामार्गाच्या जोडणीवर आहे. वरील दोन्ही महामार्ग वाहतूकीसाठी सुलभ व सोयीचे झाले असल्याने या वरील वाहतूक



खूप पटीने वाढली आहे. यामध्ये अवजड वाहनांची संख्या ही वाढली आहे. परिणामता केज शहर अंतर्गत भागात अपघातांची संख्याही वाढली आहे. शहरातील नागरिक, विद्यार्थी व वृद्धाना पायी चालणे अवघड झाले आहे. यासाठी आता केज शहरांतील अंतर्गत भागात रस्त्यालगत फुटपाथ बनवणे गरजेचे आहे व सततच्या होणाऱ्या वाहतूक कोंडीसाठी आता बायपास (रिंगरोड) अथवा उड्डाणपुल यापैकी जे सोयीचे व फायद्याचे आहे ते मंजूर करून तयार करावे.

याशिवाय केज शहरात अत्यंत मोक्याच्या ठिकाणी बीड रोड लगत बसडेपो साठी साडेसात एकर जमीन आरक्षित केलेली आहे. याठिकाणी बसडेपो मंजूर करून सुरु करावा अशी समितीची केजवासियांच्या वतीने अनेक दिवसापासून मागणी आहे. शासनाच्या नवीन धोरणानुसार इलेक्ट्रिक चार्जींग सेंटर व ई बसडेपो सुरु करणेही सोयीचे आहे. यासाठीही समिती सतत पाठपुरावा करत आहे. तरी याबाबत आमदार महोदया व शासनाने तात्काळ कार्यवाही करावी अशी समितीने मागणी केली आहे. याबाबत निवेदनाच्या प्रती आमदार नमिताताई मुंदडा व केज तहसीलदार यांना देण्यात आल्या आहेत. निवेदनावर हनुमंत भोसले, नासेर मुंडे, शेषराव घोरपडे व इंजिनियर मोहनराव कराड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# संकेत तुकाराम सानप यांचा पुन्हा नवा आदर्श

## निमोण तालुका संगमनेर अहिल्यानगर जिल्ह्यातील गरीब मंडलिक कुटुंबाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून दिलासा

## संकेत तुकाराम सानप यांच्या प्रयत्नांना यश तात्काळ ८० हजार रूपये निधी उपलब्ध

**मुंबई । प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी व लोकसेवा हाच आपला धर्म मानून काम करणाऱ्या मुंबई मंत्रालयातील आदर्श तिगावचे सुपुत्र संकेत तुकाराम सानप यांनी पुन्हा एकदा जनसेवेचा आदर्श उभा केला आहे. त्यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे निमोण गावातील संगमनेर तालुक्यातील अहिल्यानगर जिल्ह्यातील गरीब व गरजू कुटुंबातील रुग्ण सागर रघुनाथ मंडलिक यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ८० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे.

सागर रघुनाथ मंडलिक हे गेल्या काही काळापासून मेंदु रोग गंभीर आजाराशी झुंज देत असून, उपचारासाठी मोठा खर्च होत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या या कुटुंबासाठी एवढा खर्च परवडणारा नव्हता. याची दखल घेत मंत्रालय प्रतिनिधी संकेत सानप यांनी वैद्यकीय कागदपत्रांसह शासन दरबारी पाठपुरावा करून मदतीची फाईल मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे पाठवली. अखेरीस त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आज ८० हजार रुपयांची मदत मंजूर करून रुग्णाच्या कुटुंबाच्या हाती पोहचवण्यात आली.

डॉक्टर संजीव देसाई सी एन एस हॉस्पिटल नाशिक मायलान सर्कल मुंबई नाका नाशिक येथे सदर पेशंट खउण वार्डात ऍडमिट आहेत, निमोण तालुका संगमनेर येथील पेशंट सागर रघुनाथ रघुनाथ मंडलिक यांच्या मेंदू या आजारावरील उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून ८० हजार रुपयाची तात्काळ मदत या मदतीमुळे निमोन येथील सागर रघुनाथ मंडले यांच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. रुग्णालयातील वाढते खर्च, औषधोपचार व इतर वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी ही मदत उपयोगी ठरणार आहे. या निर्णयाबद्दल गावकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक जनतेकडून संकेत सानप यांचे अभिनंदन होत आहे. संकेत तुकाराम सानप यांनी यावेळी भावना व्यक्त करताना सांगितले की, गरीब, शेतकरी, मजूर, दिव्यांग आणि आजारपणाशी झगडणाऱ्या प्रत्येक गरजू कुटुंबासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी हा मोठा आधार आहे. शासनाच्या प्रत्येक योजना व मदतीचा लाभ खऱ्या अर्थाने जनतेपर्यंत पोहोचला पाहिजे, यासाठी मी सतत प्रयत्नशील आहे. सागर रघुनाथ मंडलिक यांना मदत मिळाल्याने माझ्या सेवाकार्यातील एक ध्येय साध्य झाल्यासारखे वाटते.



मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख रामेश्वर नाईक यांनीही या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, संकेत सानप यांच्यासारखे तरुण प्रतिनिधी जर अशा पद्धतीने जनतेच्या समस्यांचा पाठपुरावा करत राहिले, तर खऱ्या अर्थाने शासनाच्या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचेल. सागर रघुनाथ मंडलिक यांच्या कुटुंबीयांनी या मदतीबद्दल मुख्यमंत्री, निधी प्रमुख तसेच संकेत तुकाराम सानप यांचे आभार मानले असून गावातील नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले आहे. सामाजिक कार्य आणि जनसेवा हाच मार्ग निवडलेल्या संकेत सानप यांच्या या कार्यामुळे तरुण पिढीला प्रेरणा मिळत आहे. शासनाची मदत - जनतेच्या हाती हा उद्देश साध्य करताना आदर्श तिगावचे सुपुत्र संकेत तुकाराम सानप यांनी दिलेला हा दिलासा समाजातील वंचितांसाठी आशेचा किरण ठरला आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड - ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com